दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २४३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.३ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्यात 'ई-ऑफिस' प्रणाली ; १ एप्रिलपासून अंमलबजावणी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि कागदविरहीत (पेपरलेस) होण्यासाठी येत्या एक एप्रिलपासून राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणाली सुरू करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी जाहीर केले. दरम्यान, केंद्राच्या धर्तीवर राज्यातदेखील निर्णयासाठी सरकारी कामकाजाच्या फाइल चार स्तरापर्यंतच पाठविण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.**

केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाचे सचिव व्ही. श्रीनिवास यांनी गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या



वेळी उपस्थित होते. प्रशासकीय सुधारणांच्या क्षेत्रात विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले जात असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी श्रीनिवास यांचे कौतुक केले.

'राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल. शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहीत होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. त्यामुळे येत्या एक एप्रिलपासून राज्याच्या सर्व कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणाली सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली. सर्व कार्यालये 'ई-ऑफिस' वापरू लागल्यानंतर मोबाइलवरदेखील कामकाजाच्या फाइल्स, कागदपत्रे पाहता येतील. त्याला मान्यता देता येणार आहे,' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सध्या मुख्यमंत्र्यांकडे निर्णयासाठी येणारी फाइल आठ विविध स्तरांमधून येते. या अधिकच्या स्तरांमुळे संबंधित विषयांच्या फाइल्सवर निर्णय होण्यास विलंब लागतो. म्हणून गतिमान कारभारासाठी फाइल्स सादर करण्याचे स्तर कमी करण्याच्या सूचना देतानाच फक्त चार स्तरांवरूनच ही फाइल पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. ई-सेवा निर्देशांकातदेखील महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आणण्यासाठी जास्तीतजास्त सेवांची संख्या वाढविण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या. सध्या राज्यातील ४५० सेवा ऑनलाइन दिल्या जात आहेत.

# कत्तलीसाठी डांबलेली १४ जनावरे, मांस व साहित्य जप्त; 3 जणांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । महाड**

गोवंश जातीच्या जनावरांची हत्या करण्यास शासनाची बंदी असतानाही आपल्या गोठ्यात १४ जनावरांना कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या आणि एका जनावराची कत्तल करून त्याच्या मांसाची विक्री करण्याचा उद्देश असणाऱ्या तिघांना महाड एमआयडीसी पोलिसांनी रंगेहाथ पकडले असून त्यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महाड एमआयडीसी पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी कि चांढवे बु. येथील फैजल फज्ञल अंतुले याचे गोठ्यामध्ये जनावरांची बेकायदेशीर कत्तल करून त्यांचे मांस विक्री केले जाते अशी खबर पोलिसांना मिळाल्याने १ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वा.चे सुमारास पोलिसांनी सापळा रचून गोठ्यावर छापा मारला असता या गोठ्यात ८ गायी, ३ बैल, १ रेडा, २ म्हैस बांधून ठेवलेल्या अवस्थेत तर दोन तीन टब मध्ये जनावरांचे मांस कापून ठेवलेले आढळून आले.

पोलिसानी या ठिकाणाहून जनावरांच्या कत्तलीसाठी लागणारे सुरे आदी साहीत्य, १४ जनावरे व मांस असा एकुण ९० हजार ३०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी फैजल अतुले, बशीर महमुद अंतुले, वय ६५, अफजल अहमद अब्दुल्ला अंतुले वय ६३ यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शॉर्ट सर्किटमुळे गुरांच्या गोठ्याला आग ; ८ गुरे गंभीर

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

शॉर्ट सर्किटमुळे गुरांच्या गोठ्याला आग लागण्याची दुर्देवी घटना रोहे तालुक्यातील खांब या गावी या घडली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार खांब येथील रहिवासी असलेले व नुकतेच वन विभागातून सन्मानाने सेवानिवृत्त झालेले वनाधिकारी शंकर धनावडे भाऊसाहेब यांनी आपल्या सेवानिवृत्तीनंतर आपल्या परिवाराचे सहकार्याने आपल्या राहत्या जागेत तीन चार वर्षांपूर्वी भाजीपाल्याची शेती, पशूपालन व घरगुती खाणावळ आदी व्यवसायास प्रारंभ केला. या व्यवसायापासून त्यांना चांगले समाधान मिळत होते. तर त्यांचे चिरंजीव यांनी पशूपालनातुन दुग्धव्यवसाय करून आपल्या व्यवसायात स्थिरावला असतानाच दि.१ डिसेंबर



रोजी सायंकाळच्या सुमारास गुरांच्या गोठ्यास शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागण्याची घटना घडल्याने या घटनेत गुरांचा गोठा तर जळून खाक झालाच याशिवाय गोठ्यात असणारी सर्व म्हणजे आठही गुरे मोठ्या प्रमाणावर भाजली. यापैकी चार गाई या दुभत्या होत्या. शॉर्टसर्किटमुळे गुरांच्या

.../२

# कर्णकर्कश आवाज करणाऱ्या ४७ सायलेन्सरवर वाहतूक शाखेने फिरवला रोडरोलर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्णकर्कश आवाज करणाऱ्या ४७ सायलेन्सरवर रोडरोलर फिरवून ते नष्ट करण्याची कारवाई छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आज पनवेल वाहतूक शाखेने केली आहे.


उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करताना नवी मुंबईचे पोलिस आयुक्त बिपीनकुमार सिंह, वाहतूक पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल वाहतूक पोलिस शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय नाळे आणि पथकाने कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दुचाकी वाहनांवर कारवाई करून त्यांचे सायलेन्सर जप्त करण्यास वाहतूक शाखेने सुरुवात केली आहे. या कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेल्या सर्व सायलेन्सरवर रोड रोलर चालवून ते नष्ट करण्यात आले आहेत. जवळपास ४७ सायलेन्सर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आज सकाळी नष्ट करण्यात आले आहे. या कारवाई वेळी पनवेल वाहतूक पोलिस शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय नाळे, पोलीस उपनिरिक्षक खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक जाधव, पोलीस हवालदार श्रीगणेश, पो.ना.हनुमान आंधळे, पो.शि.बादल यांच्यासह नागरिक उपस्थित होते. तसेच यापुढे देखील कर्णकर्कश्य आवाज करणाऱ्या सायलेन्सर वर कारवाई सुरूच राहील अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय नाळे यांनी दिली.


## अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये धडाकेबाज कारवाई

# अनधिकृतपणे वाळू उत्खनन करणाऱ्या १० बोटींवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**तळोजा, खारघर खाडीत अनधिकृतपणे वाळू उत्खनन करणाऱ्या वाळू माफिया विरोधात प्रशासनाने कारवाईचा बडगा उचलला आहे. प्रशासनाने आतापर्यंत केलेल्या कारवाईपैकी ही सर्वात मोठी व धडक कारवाई आहे. या कारवाईत ४ मोठया बार्ज आणि ४ मध्यम बार्ज व २ छोट्या संक्शन पंपच्या बोटी अशा १० बोटीवरती धडक कारवाई करण्यात आली असून कोट्यवधीचा माल जप्त करण्यात आला आहे. संबधिताविरुद्ध एन.आर.आय. पोलीस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**





जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशान्वये अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्या नेतृत्वाखाली पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी ही कारवाई केली आहे. त्यामुळे अवैध वाळू काढणाऱ्या माफियाचे धाबे दणाणले आहेत.

पनवेल तालुक्यातील खाडी परिसरात अनधिकृतपणे वाळू उपसा करून निसर्गाला हानी पोहचविण्याचे काम वाळू माफिया कडून सुरू होते. जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव व त तहसीलदार विजय तळेकर तसेच संतोष पाटील, तहसील कार्यालयातील अधिकारी

.../२

# मानाच्या अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला पनवेलमध्ये प्रारंभ



**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ९ व्या मानाच्या अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला आजपासून (दि. ०२) पनवेलमध्ये प्रारंभ झाला असून या महाअंतिम फेरीचे उदघाटन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्रसिद्ध लेखक, निर्माते व दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे, अभिनेते, लेखक व दिग्दर्शक अभिराम भडकमकर, अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक विजय गोखले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, स्पर्धा प्रमुख व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, अभिनेते भरत सावले, माजी उपमहापौर सीता पाटील, चारुशीला घरत, अतुल पाटील, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अजय बहिरा, राजू सोनी, विकास घरत, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा वर्षा नाईक, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, रुचिता लोंढे, राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, प्रज्ञा प्रकोष्ठचे जिल्हा संयोजक डॉ. मयुरेश जोशी, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, खजिनदार अमोल खेर, गणेश जगताप, चिन्मय समेळ, संजीव कुलकर्णी, निखिल गोरे, अक्षय सिंग यांच्यासह टीम अटल करंडक, स्पर्धक व नाट्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रंगमंच आमचा... कलाविष्कार तुमचा हे ब्रीद वाक्य घेऊन गेली १५ वर्ष पनवेल मध्ये एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. आधी सात वर्ष ही स्पर्धा मल्हार करंडक या नावाने जिल्हास्तरीय स्वरूपात आयोजित केली जात होती. आता गेली आठ वर्ष ही स्पर्धा अटल करंडक या नावाने राज्यस्तरीय स्वरूपात आयोजित केली जात आहे. नाटय चळवळ वद्धींगत व्हावी व

.../२

# जेएनपीए लाँच सेवा गेट वे ऐवजी भाऊच्या धक्क्यावरून 'नेव्ही डे'साठी चार दिवस गेटवे धक्का बंद


**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए ते मुंबई ही जलसेवा आहे. ती पावसाळ्यात जून ते सप्टेंबर चार महिने भाऊचा धक्का तर सप्टेंबर ते मे या महिन्यात जेएनपीए ते गेट वे ऑफ इंडिया अशी सुरू असते.जेएनपीए बंदर ते मुंबई गेट वे ऑफ इंडिया ही जलसेवा १ ते ४ डिसेंबर २०२२ दरम्यान गेटवे ऐवजी भाऊचा धक्का येथे लागणार आहे. व भाऊचा धक्का ते जेएनपीए असा प्रवास करणार आहे. गेट वे परिसरात चार दिवस नौदल डे साजरा होत आहे.

त्यामुळे जेएनपीए वरून गेट वे ऑफ इंडिया येथे जाणारी प्रवासी बोट चार दिवस भाऊच्या धक्यावर जाईल व तेथूनच जेएनपीटीला येईल. अशी माहिती जेएनपीए वाहतूक विभागाने दिली आहे. जेएनपीए ते मुंबई ही जलसेवा आहे. ती पावसाळ्यात जून ते सप्टेंबर चार महिने भाऊचा धक्का तर सप्टेंबर ते मे या महिन्यात जेएनपीए ते गेट वे ऑफ इंडिया अशी सुरू असते.

या बोटीतून जेएनपीए बंदरातील कामगार, कुटुंबीय तसेच इतर नागरिक ही दररोज प्रवास करतात.

उरण जेएनपीए ते दक्षिण मुंबई या एक तासांचा प्रवास आहे. मात्र जेएनपीए व्यतिरिक्त नागरिकांना हा प्रवास महागाचा पडतो. तर जेएनपीए कामगारासाठी मोफत आणि त्यांच्या कुटुंबियांना अल्पदरात हा प्रवास करता येतो. या जलमार्गावर जेएनपीए मधील खाजगी बंदरातील कामगार ही प्रवास करतात. या सेवेसाठी जेएनपीए कामगार वसाहत ते जेएनपीए धक्का अशी स्वतंत्र बस सेवा ही आहे. त्याचप्रमाणे विना अडथळा मुंबईत प्रवास करता येत असल्याने या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे.



# सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या महिलेस अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरकामास राहून घरातील सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या महिलेस गुन्हे शाखा कक्ष २ ने ४८ तासात अटक करून तिच्याकडून ३ लाख ३० हजार किंमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

ऑक्टोबर व नोव्हेबर महिन्यामध्ये फिर्यादी यांचे घराचे नुतनीकरण असल्यामुळे फिर्यादी हे त्यांच्या बहिणीच्या घरी सत्यम हाईट्स, प्लॉट नंबर ८१, सेक्टर १९, कामोठे येथे राहणेस होते. सदर घरामध्ये फिर्यादी यानी बेडरूमधील कपाटात त्यांचे आई वडिलांचे सोन्याचे दागिने ठेवलेले होते. सदरचे सोन्याचे दागिने त्यांच्या घरामध्ये काम करणारी संकिता जाधव (पुर्ण नाव व पत्ता माहिती नाही) हिने चोरी केले असल्याच्या संशयावरुन कामोठे पोलीस ठाणे गु.र.न. क.२९३/२०२२ भा.द.वी. कलम ३८१ प्रमाणे नोंद करण्यात आला होता. मालमत्ते संदर्भात घडलेल्या गुन्हयाची तात्काळ उकल करणे बाबत



मा.पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई, मा.सह पोलीस आयुक्त सो, मा. अपर 'पोलीस आयुक्त (गुन्हे) महेश घुर्ये , मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमित काळे यांनी आदेशीत केले होते.

सदर गुन्ह्याचा तपासाचे अनुषंगाने मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) विनायक वस्त यांचे मार्गदशानाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील, गुन्हे शाखा कक्ष ०२,पनवेल नवी मुंबई यांचे नेतृत्वाखाली पोलीस पथक नेमून सदर गुन्हयाचा समांतर तपास करत असताना संशयीत महिला संकिता संतोष जाधव रा. सेक्टर १४, कामोठे हिस ताब्यात घेवून तिला विश्वासात घेवून तिच्याकडे कौशल्याने चौकशी केला असता तिने सदरचा गुन्हा केला असल्याचे कबुल केले.

.../२

# नवे आव्हान; नव्या संधी

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जगाची जी फेररचना झाली आणि जी अजूनही चालू आहे; तीत जुने राष्ट्रसमूह मागे पडले. नवे जन्माला आले. राष्ट्रकुल किंवा अलिप्तता चळवळींचे महत्त्व उणावले. वॉर्सा कराराने बांधल्या गेलेल्या कम्युनिस्ट देशांच्या नात्यांची वीण उसवली आणि त्याचवेळी, 'नाटो' या जेत्या मित्रराष्ट्रांच्या समूहाचा मात्र विस्तार झाला. त्याचे एक रूप युक्रेन युद्धातही दिसते आहे. याच काळात 'ओपेक'च्या रूपाने तेलोत्पादक राष्ट्रांची बलाढ्य संघटना उभी राहिली. तिने काही काळ जगाला दावणीलाही बांधले. 'सार्क' संघटनेच्या रूपाने भारताच्या प्रभावळीतील देशांच्या संघटनेचा प्रयोग व्यापार किंवा इतर संबंधांबाबतही अपेक्षेइतका यशस्वी झालेला नाही. या पार्श्वभूमीवर भारताकडे 'जी-२०' या १९ देशांच्या आणि युरोपीय महासंघाच्या समूहाचे नेतृत्व येणे, हे अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे. ती भारतासाठी एक मोठी संधी आहे; तसेच, ते आव्हानही आहे. हे अध्यक्षपद म्हणजे एका पक्षाचे किंवा सरकारचे यश नसून आपली राष्ट्रीय कर्तबगारी व जबाबदारी आहे, या जाणिवेतून काम झाले तर एक नवा, आधुनिक भारत जगापुढे जाईल आणि विकसित देशांशी होणाऱ्या भारताच्या अर्थमैत्रीला अधिक सघन संदर्भ प्राप्त होतील. आज जगाचा नकाशा पाहिला तर अमेरिका, चीन, भारत, युरोपीय महासंघ, इटली, जपान, रशिया, सौदी अरेबिया या साऱ्यांचा समावेश असणारा हा सगळ्यांत बलिष्ठ राष्ट्रगट आहे. जगाचे जवळपास ८० टक्के अर्थकारण या देशांमध्ये केंद्रित आहे. त्याचवेळी, जगातील ७५ टक्के कर्बोत्सर्जन हेच देश करतात. थोडक्यात, जगाच्या गतीचे आणि प्रगतीचे सुकाणू हाती असणारे हे देश आहेत. हा गट वरवर एकसंध वाटला तरी त्यात मोठे अंतर्विरोध आणि खेच आहेत. भारत यातून या राष्ट्रसमूहाला काही दिशा देऊ शकतो का, हे आता पुढच्या वर्षभरात कळेल. गेल्या काही काळात परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे सातत्याने महत्त्वाचे आणि भविष्यवेधी विवेचन करीत आहेत. जी-२० चे अध्यक्षपद आल्यानंतरही ७५ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना 'भारताचे अध्यक्षपद म्हणजे पृथ्वीच्या दक्षिणेचा आवाज मजबूत होणे आहे,' असे ते म्हणाले. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका ही पृथ्वीची दक्षिण आणि युरोप, अमेरिका, कॅनडा आदी विकसित देशांचा पृथ्वीचा उत्तर भाग ही विभागणी नवी नाही. भारत एकीकडे झपाट्याने विकसित होत असताना त्याने केवळ युरोप किंवा अमेरिकेच्या पंगतीत बसण्यात समाधान न मानता तुलनेने जगाच्या अविकसित भागाचा आवाज उठवण्याला महत्त्व आहे. भारताच्या लोकशाही परंपरेचा उल्लेख जयशंकर यांनी या राष्ट्रसमूहातील पुढच्या संवादाच्या संदर्भात केला. तोही महत्त्वाचा व चीन व रशिया यांना झोंबणारा आहे. जगाच्या अर्थकारणासमोर आता व्यामिश्र आव्हाने आहेत. गरिबीची लढाई पुरती जिंकली गेलेली नाही. तेवढ्यातच, हवामान बदल व इतर समस्या उग्र होऊ लागल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही हे अध्यक्षपद स्वीकारताना हवामान बदल, विविध रोगांच्या साथी आणि दहशतवाद या तीन आव्हानांचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. भारत आपल्या कार्यकाळात दहशतवादाचा मुद्दा लावून धरण्याची शक्यता आहे आणि त्यातून पाकिस्तान व इतरही काही देशांवर आर्थिक निर्बंधांची कारवाई करण्याचा दबाव वाढू शकतो. 'हा युद्धाचा काळ राहिलेला नाही..' असे मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना युक्रेन आक्रमणाच्या संदर्भात एकदा सुनावले होते. याचा त्यांनी हे अध्यक्षपद स्वीकारताना पुनरुच्चार केला. मात्र, हे विधान केवळ रशियाला नव्हे तर विश्वकारणात अवांछनीय चबढब करणाऱ्या अमेरिका व तिच्या मित्रदेशांनाही उद्देशून आहे. करोनोत्तर काळात एकीकडे चीन व दुसरीकडे विकसित देश या दोघांपेक्षाही जास्त ठेवणाऱ्या भारताच्या शब्दाला आज या आर्थिक ताकदीमुळे वजन येते आहे. भारतात चालू वर्षाच्या अखेर जगभरातील भारतीयांनी पाठविलेली रक्कम ८२ हजार कोटी रुपयांच्या घरात जाणार आहे. हे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. भारतातील थेट परकीय औद्योगिक गुंतवणुकीचा ओघही इतर देशांपेक्षा कितीतरी जास्त आहे. या आर्थिक ताकदीचा वापर भारत जी-२०चे नेतृत्व करताना कसा करतो, याला महत्त्व आहे. मोदी व जयशंकर यांनी भारताच्या परराष्ट्र धोरण पाकिस्तान व चीनकेंद्री होऊ दिलेले नाही. आपण भारतीय परंपरेचा आदर्श ठेवत विश्वकल्याणाचा विचार करीत असतो; हे दाखवून देण्याची सहजसंधी या अध्यक्षपदामुळे आली आहे. मात्र, अशा संघटनांकडे कोणतेही ठोस अधिकार नसतात. जी-२०ला कायमस्वरुपी सचिवालय असावे, यावरही अद्याप एकमत नाही. तसेच, युक्रेनसारख्या संघर्षात संयुक्त राष्ट्रेच काही करू शकली नाहीत; तर जी-२० काही करू शकेल, असे नाही. मात्र, भारताच्या आर्थिक विकासाला या अध्यक्षपदाने बळ मिळू शकते. जगाची ६० टक्के लोकसंख्या, ७५ टक्के व्यापार आणि ८० टक्के देशांतर्गत उत्पादन असा व्याप असणाऱ्या संघटनेला नवी दिशा देण्याचे आव्हान आता आहे. ते पेलून दाखवावे लागेल.

# महाड येथील को.ए.सो.वि.ह.परांजपे विद्यामंदिरामध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे मॉकड्रिल यशस्वीरित्या संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नागरी संरक्षण दल व होमगार्ड यांच्यामार्फत राज्य स्कूल सेफ्टी कार्यक्रमांतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील शाळांमध्ये आपत्तीचे मॉकड्रिल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यशिक्षण विभाग व युएनडीपी तसेच महाराष्ट्र आपत्ती विभाग यांच्या पुढाकाराने रिका इंडिया या संस्थेच्या सहाय्याने राज्यभरात असे मॉकड्रिल होणार आहेत. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील महाड मधील को.ए.सो. वि.ह.परांजपे विद्यामंदिर, महाड या शाळेची निवड करण्यात आली होती. त्यानुसार को.ए.सो. वि.ह.परांजपे विद्यामंदिर, महाड येथे बुधवार दि. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११.४० वा. मॉकड्रिल कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.



सकाळी नागरी संरक्षण दलाचे अधिकारी व त्यांच्या सहकार्याने शाळेत सकाळी ८.०० ते ११.०० यावेळेत शाळ-`तील इ.९ वी च्या वर्गातील ८७ विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक सरावाचे प्रशिक्षण दिले. यामध्ये विद्यार्थ्यांना धोक्याची आगविमोचन, स्थलांतर जागा, व जखमींना मदत कार्य कसे याचे प्रात्यक्षिके दाखवून नैसर्गिक आपत्तीचे प्रशिक्षण दिले. त्यानंतर ११.४० वा. मॉक ड्रिलला सुरवात झाली. १२.१० ते १२.३० पर्यंत मॉकड्रिलचे रिपोर्टिंग झाले. त्यानंतर १२.३० ते १.०० पर्यंत अग्निशमनद्वारे प्रात्यक्षिक विमोचन आणि फायर फायटींगचे प्रात्यक्षिक सराव प्रशिक्षण 'दिले. यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेऊन सराव करून घेतला.

शाळेचे सभापती श्री.मिलिंद टिपणीस, महाडचे नायब तहसिलदार श्री प्रदीप कुडळ, श्री.सुरेश खोपकर, नागरी संरक्षण दलाचे अधिकारी सहाय्यक उपनियंत्रक श्री.का.र.कुरकुटे, श्री.श.भा.शिरसाट, वरिष्ठ प्रशासकीय लिपिक श्री. वि.ग.पाटील, रिका इंडिया या संस्थेच्या पोग्रॅम मॅनेजर श्रीम.अंम्बिका डबराल, होमगार्ड डिपार्टमेंटचे अधिकारी रायगड जिल्हा प्रभारी केंद्रनायक श्री.गणेश कदम, तालुका समादेशक अधिकारी श्री.एस.एस.अंतुले, होमगार्डचे प्रफुल्ल जाधव, श्री.राजू पाटील, अग्निशामक दलाचे अधिकारी श्री.गणेश पाटील आणि त्यांची टीम, पंचायत समिती महाडचे प्रतिनिधी श्री.म्हात्रे, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. स्वराली रोठ, शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील पालकवर्ग, शाळेतील सर्व विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीत शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे मॉक ड्रिल घेण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाची व्यवस्था व सूत्रसंचालन शाळेतील जेष्ठ सहाय्यक शिक्षक ज्ञानदेव साळवे यांनी केली.

शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतलेले शाळेतील सहाय्यक शिक्षक श्री.नरेश पाटील यांनी आपत्ती प्रात्यक्षिकाचे नियोजन केले आणि शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मानले. अशा प्रकारे आपत्ती व्यवस्थापनाचे मॉक ड्रिल यशस्वीरित्या संपन्न झाले.

# बॅ.अंतुले यांनी गरीब हाच विकासाचा केंद्रबिंदू मानून कोकणचा विकास केला : मुश्ताक अंतुले

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री,कोकणचे भाग्य विधाते स्व.बॅ.ए.आर.अंतुले यांचा सातवा स्मृतिदिन सोहळा म्हसळा येथील वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅ. ए. आर. अंतूले विज्ञान महाविद्यालयामधे संपन्न झाला. डी. एड.कॉलेज चे चेअरमन नाझिम चोगले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या स्मृतिदिन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मुशताक अंतूले, जिल्ह्याचे माजी काँग्रेस अध्यक्ष आर. सी. घरत, महाविद्यालयीन विकास व्यवस्थापन समिती सदस्य तथा सचिव प्रतिनिधी फझल हालडे, अंजुमन हायस्कूलचे प्राच्यार्य महंमद तांबे, तालुका काँग्रेस चे माजी अध्यक्ष महादेव भिकु पाटिल, मच्छिन्द्र जाधव, अक्रम साटविलकर, अहमद अली पेनकर, निजाम कागदी,नासिर मिठागरे, निलम वेटकोळी, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभिजित पाटिल, सुदाम पाटिल, भाई म्हात्रे, प्रताप गावंड, साहिल रेळेकर, जिल्ह्यातून आलेले सर्व कार्यकर्ते, हितचिंतक उपस्थित होते.



याप्रसंगी अनेक मान्यवरांनी बॅ.ए.आर. अंतुले, बॅ. अंतुले यांच्या कार्याचा गौरव करताना बॅ. अंतूले यांच्या कार्याचा गौरव केला. आपल्या मनोगतात मुशताक अंतूले यांनी सांगितले की देशाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे समर्थ नेतृत्व काळाने आपल्यातून हिराऊन घेतले आहे.अखेरच्या श्वासापर्यंत गोरगरीब जनतेच्या सुख व समृद्धीचे धाडसी निर्णय घेऊन गरीब हाच विकासाचा केंद्रबिंदू मानून गरीबाना सुखी ठेवण्याचे निर्णय त्यांनी घेतले असे सांगून सर्वधर्म समभाव मानणारे असामान्य व्यक्तिमत्व म्हणजे बॅ.ए.आर.अंतुले अस म्हटल तर वावगे ठरणार नसल्याचे मुशताक अंतूले यांनी सांगितले. बॅ. अंतुले यांनी निस्वार्थीपणे राजकारण केलं. कोकणातील गरीबातल्या गरीब सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्याला तंत्र शिक्षण घेता यावे म्हणून लोणेरे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापना केली त्यावेळी त्यांनी कुटुंबातील कोणाचेही नाव या विद्यापीठाला न देता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव कायम प्रत्येकाच्या मुखात रहावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ सुरु केले. आपल्या मनोगतात फझल हलडे यांनी सांगितले कि बॅ. अंतुले यांची दूरदृष्टी एवढी प्रबळ होती की ग्रामिण भागातील विद्यार्थी हा पदवीधर झाला पाहिजे यासाठी म्हसळा-मुरुड सारख्या ग्रामिण भागात महाविद्यालय सुरु केले, त्यालाही स्वतःचे नाव न देता महामानव राज्याचे माजी मुखमंत्री वसंतराव नाईक यांच्या नावाने महाविद्यालये सुरु केली. भारतीय जनतेसाठी त्यांनी अनेक त्याग केल्यानेच आज संपूर्ण कोकणातच नव्हे तर संपूर्ण देशात बॅ. अंतुले यांचे नाव आदराने घेतले जाते. बॅ. अंतुले यांचे विचार प्रेरणादायी असून त्यांची उंची गाठणं हे निश्चितपणे कोणालाही जमलं नाही आणि ते जमणे अशक्य असल्याचे सांगितले. केवळ जनतेच्या अति अग्रहास्तव म्हसळा येथे सुरु करण्यात आलेले विज्ञान महाविद्यालय सुरु करुन सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्याला उच्च शिक्षण घेण्याची संधी प्राप्त करून दिली असेही फझल हालडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. बॅ. अंतुले यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील १०० कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

# तळा-इंदापूर रस्त्यावर कार-ॲक्टीव्हा धडक ; दुचाकीस्वार गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । तळा**

इंदापूर तळा रोडवर काल संध्याकाळी ६ वा चे दरम्यान निगुडशेत फाटा येथे चार चाकी वाहन एर्टीका याची निगुडशेत फाटा येथील वळणावर समोरासमोर ठोकर होऊन तन्वीर शाहिद रहाटविलकर याला गंभीर दुखापत झाली असून माणगाव उप जिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी तातडीने पाठविण्यात आले व पुढील उपचारासाठी एम्.जी.एम् रुग्णालय कळंबोली येथे उपचार सुरू आहेत.



याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार तळा इंदापूर मार्गावर एमएच.४६ W- ५५०४ या नंबरची गाडी एर्टिका मालक सुयोग मनोहर चव्हाण हे माणगाव येथे जात असताना निगुडशेत फाटा तेथे पोचले असता समोरून इंदापूर बाजूकडून एक्टिवा गाडी नंबर एम एच ०६- BK -५३३० ही रस्त्याच्या परिस्थीतीकडेदुर्लक्ष करून विरुद्ध साईडला येऊन कारच्या समोरील उजव्या बाजूला जोरात धडक दिली. त्यामुळे स्कुटी चालक जोरात आढळल्याने डोक्याला व इतर ठिकाणी जोरात दुखापत झाली असून तातडीने माणगाव येथे उपचार करता पाठवण्यात आले. दिघी पोर्ट कडे जाणारा रस्ता अतिशय चांगला रूंद झालेला असून छोटे वाहन चालक या मार्गावरून अतीशय वेगात असतात वळणे मोठी असूनही रस्त्याच्या कडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे वेगाने वाहनांचे अपघात होत आहेत या घटनेची फिर्याद सुयोग मनोहर चव्हाण तळा यांनी तळा पोलीस ठाण्यात केली असून फेटल अपघात रजिस्टर नं.४/२०२२ करण्यात आली असून पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरेश पवार करीत असून करीत आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शॉर्ट सर्किटमुळे गुरांच्या गोठ्याला आग ; ८ गुरे गंभीर

गोठ्यास आग लागल्याचे वृत्त सर्वत्र समजले असता अनेक तरूण व जेष्ठ नागरिक यांनी घटनास्थळी धाव घेऊन व प्रसंगावधान राखून स्वत:च्या जीवांची पर्वा न करता गुरांना गोठ्यातून काढण्यात यश मिळविल्याने गुरे फार मोठ्या प्रमाणावर जखमी झाली नाहीत की नशिबाने दगावण्याची घटना घडली नाही. शॉर्ट सर्किटमुळे गुरांच्या गोठ्याचे झालेले मोठे नुकसान व आगीच्या ज्वाला गुरांच्या शरीरास लागल्याने गुरेही तडफडताना दिसत होती. या दुर्दैवी घटनेची सर्वत्र हळहळ व्यक्त होताना दिसत आहे.तर शासकीय स्तरावर या घटनेची दखल घेऊन जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्याचे प्रयत्न करावेत असे सर्वत्र बोलले जाऊ लागले आहे.

## मानाच्या अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला पनवेलमध्ये प्रारंभ

नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे आणि त्या अनुषंगाने त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वर्द्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्य रसिकांच्या गळयातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यस्तरीय विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक असे पारितोषिकाचे स्वरूप आहे. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे.

अटल करंडक एकांकीका स्पर्धेमध्ये एकूण रुपये २ लाख ७५ हजार रुपये रक्कम स्वरूपात पारितोषिके असून ज्येष्ठ कलावंत, रंगकर्मी जयंत सावरकर यांचा 'गौरव रंगभूमीचा' या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबर पनवेल मधील दिवंगत लोकप्रिय नाट्य कलावंत व वेशभूषाकार कै. किशोर जोशी ह्यांच्या स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट वेशभूषा हा विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे. गेली आठ वर्षे चाललेल्या या स्पर्धेने टप्प्याटप्प्याने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला आहे. कोरोना काळातही एवढ्या मोठया स्तरावर अटल करंडक ही एकमेव स्पर्धा होती, जी संपूर्ण महाराष्ट्रात यशस्वीरीत्या संपन्न झाली. यावर्षी देखील अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला प्राथमिक फेरीसाठी ११५ हुन अधिक संघांनी सहभाग घेतला आहे. त्यामधून महाअंतिम फेरीसाठी सर्वोत्कृष्ट अशा २५ एकांकिकांची निवड झाली आहे. त्यानुसार शुक्रवारी (दि. ०२) शोधयात्रा (सहज प्रोडक्शन, पुणे), नातीचरामी (फ्रायडे फिल्म्स, अलिबाग), थँक्यू - (आर डी क्रिएशन्स, मुंबई), गोदा - (माय नाटक कंपनी, मुंबई ), ओल्या भिंती (कलासक्त, नाशिक), रंगा येई हो (इष्ट मन कलर, पुणे), बारम - (एम.डी. कॉलेज, मुंबई), अशांती पर्व (याझसेन रंगभूमी, नाशिक), प्रवास- (भवन्स महाविद्यालय, मुंबई) या नऊ एकांकिकांचे सादरीकरण होते.

## सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या महिलेस अटक

सदर महिलेस अटक करुन तिच्याकडून गुन्हयात चोरीस गेलेले एकुण ०३,३०,०००/-रुपये किंमतीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल नवी मुंबई चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सपोनि संदीप गायकवाड, प्रविण फडतरे, पोउपनि. मानसिंग पाटील, वैभव रोंगे, सुदाम पाटील, सफौ. सुदाम पाटील, पोहवा अनिल पाटील, प्रशांत काटकर, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, रणजित पाटील, सचिन पवार, ज्ञानेश्वर वाघ, इंद्रजित कानु, रूपेश पाटील, निलेश पाटील, दिपक डोंगरे, राहूल पवार, पोना अजिनाथ फुंदे, प्रफुल मोरे, मपोना/गायकवाड, मपोना/ सावंत, पोशि संजय पाटील, विंकात माळी, अजित पाटील यांनी केली.

## अनधिकृतपणे वाळू उत्खनन करणाऱ्या १० बोटींवर कारवाई

व कर्मचाऱ्यांनी अचानक वाळू माफियांच्या खाडी भागातील अनधिकृत बोटीवर धाड टाकून कारवाई केली.

या धाडीत ४ मोठ्या बार्ज आणि ४ मध्यम बार्ज व २ छोटया संक्शन पंपच्या बोटी अशा १० बोटीवरती धडक कारवाई करण्यात आलेली आहे. खारघर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात ६ बार्ज देण्यात आलेल्या आहेत व संबधितावरती ४१ डी अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. २ बोटी एन.आर.आय. पोलीसाच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत व संबधिताविरुध्द एन.आर.आय. पोलीस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ बोट गाळामध्ये फसली असल्याने जागेवरती नष्ट करण्यात आली आहे व १ बोट एन.आर.आय. पोलीसानी ताब्यात घेतली असुन त्यावर कार्यवाही चालु आहे. तसेच ५ संक्शन पंप नष्ट करण्यात आले आहेत. कोटयवधी रुपयाचा मुद्देमाल केलेल्या कारवाईत पाण्यामधून जप्त करुन संबधित पोलीस स्टेशनच्या ताब्यात देवून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशासनाकडून आजपर्यंतची ही सर्वात मोठी व धडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईने वाळू माफिया याचे धाबे दणाणले आहेत.

# वर्णे वाडी येथील तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात कर्जत तालुक्यातील वर्णे वाडी येथील तरुणांचा उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत जाहीर प्रवेश केला आहे.

कर्जत तालुकातील अनेक गावातील तरुणांचा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे तसेच माजी पर्यटन मंत्री तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्याकडे कर्जत तालुक्यातील विविध भागातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडे कल दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर दिनेश देशमुख, हेमंत बडेकर, तेजस इंगळे, जगदीश दिसले यांच्या पुढाकाराने सदरचा प्रवेश मार्गी लागला असून गुरुनाथ उघडा, सुनील उघडा, नारायण उघडा, राजा उघडा, समीर उघडा, अशोक उघडा, दिपक उघडा, तेजस उघडा, बारकू उघडा, भूषण उघडा, निलेश उघडा, भारत उघडा, बाबू उघडा, करण उघडा, दिलीप उघडा, रामदास उघडा, भरत उघडा, समीर उघडा, राजू उघडा या युवकांचा प्रवेश केला आहे.

नितीन सावंत यांनी उपजिल्हाप्रमुख पदाची सूत्र हाती घेतल्यापासून पक्षवाढीसाठी ते विशेष लक्ष देत आहेत. या पक्ष प्रवेशाला उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, तालुका संघटक बाबू घारे, कर्जत तालुका युवासेना सचिव ॲड.संपत हडप, उपतालुका संघटक दिनेश देशमुख, जिल्हा परिषद संघटक अजय शिंगटे, पंचायत समिती संघटक एकनाथ कोळंबे, उपशहर संघटक अभिजित बडेकर, शाखाप्रमुख रघुनाथ कोळंबे, भिसेगाव शाखाप्रमुख तेजस इंगळे, युवानेते जगदीश दिसले हे उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार जलतरण तलाव खेळाडू तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरु

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा क्रीडा कार्यालय, नेहुली अलिबाग येथे असलेला २५ ु २१ मीटर आकाराचा जलतरण तलाव निवडणूक व कोविडमुळे सन २०१८ पासून बंद होता. आता जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार हा जलतरण तलाव खेळाडू तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरु करण्यात आला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा कार्यालयाने या जलतरण तलावाची योग्य ती दुरुस्ती व साफसफाई करुन घेतली असून आता नागरिकांसाठी हा तलाव सुसज्ज झाला आहे. या तलावामध्ये पोहण्याकरिता शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता शुल्क रु.५०० व इतर नागरिकांसाठी रु.७५० असे राहील.

तलावामध्ये पोहण्यासाठी येताना पो-हता येणे आवश्यक असून त्याबाबतचे हमीपत्र, आधारकार्ड व फिटनेस प्रमाणपत्र ही कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. यासंदर्भात अलिबाग तालुक्यातील तसेच इतर तालुक्यतील नागरिकांनी अधिक माहितीसाठी अभिजित भगत यांच्या मो.९८८१६७४२९८ वर संपर्क साधावा आणि जास्तीत जास्त खेळाडूंनी व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## अनुश्री बामुगडे ठरली जिल्हा मॅरेथॉनची मानकरी

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील किल्ला गावची सुकन्या असणारी व उत्कृष्ट खेळाडू म्हणून नावलौकिक प्राप्त केलेल्या अनुश्री अविनाश बामुगडे हिने रायगड जिल्हा मॅरेथॉन स्पर्धेतील ८०० मी धावणे स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करून प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली आहे.

शाळेचे नाव-सेंट झेव्हियर्स हायस्कूल अण्ड ज्युनियर कॉलेज शिरगाव-महाड येथे शिक्षण घेत असलेल्या अनुश्रीने रसायनी येथील एच.ओ.सी.कॉलेज येथे संपन्न झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातून सहभाग घेऊन ही कामगिरी केली आहे.तर पुढे विभागिय स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची सुवर्णसंधी तिला प्राप्त झाली आहे.

तिच्या या सुयशाबद्दल किल्ला ग्रामस्थ, महिला मंडळ व तरूण मंडळ तसेच समस्त बामुगडे परिवार व क्रीडाप्रेमी नागरिक यांच्याकडून अभिनंदन व्यक होताना दिसत आहे.

## वीरशैव लिंगायत समाजाचा डोंबिवली येथे वधू वर पालक परिचय मेळावा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

महाराष्ट्र वीरशैव सभा ठाणे जिल्हा समिती व वीरसैव लिंगायत सेवा संस्था ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली येथे ११ डिसेंबर रोजी ३३ वा वधु वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आले असल्याचे महाराष्ट्र वीरशैव सभा प्रांतिक सदस्य बसवंतराव अळ्ळगी यांनी सांगितले आहे.

वीरशैव लिंगायत धर्मातील सर्व पोटजातील इच्छुक वधू-वरांचा व पालक मेळावा डोंबिवली येथील धर्मवीर आनंद दिघे सभागृह गांधीनगर डोंबिवली पूर्व येथे सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आले आहे. या वधू वर मेळावा दरम्यान विविध समाजात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात महात्मा बसवेश्वर समाज रत्न पुरस्कार श्री चिदानंद बसवंतराव पाटील,संत शिरोमणी अक्कमहादेवी पुरस्कार श्रीमती प्रमिला विठ्ठल लंबे यांना देण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अंबरनाथचे नगराध्यक्ष अरविंद वाळेकर, अनंत हलवाई संचालक प्रफुल्ल शेठ गवळी,अध्यक्ष शांतकुमार लच्याने, कार्याध्यक्ष प्रदीप निलाखे, सरचिटणीस सिद्धेश्वर लिगाडे, सल्लागार चंद्रकांत मनियाळ,प्रांतिक सदस्य रामलिंग मेनकुदळे चिटणीस सिद्राम बलुरे, खजिनदार श्रीकांत किरनाळे, प्रांतिक सदस्य बी.डी. अळ्ळगी, उपाध्यक्ष शिवानंद संकपाळ, उपाध्यक्ष प्रमिला लंबे आधी उपस्थित राहणार आहेत हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र वीर सेवा सभा ठाणे जिल्हा समिती, वीरशैव लिंगात सेवा संस्था ठाणे कार्यकारणी सदस्य, समाजबांधव परिश्रम घेत आहेत

# दुचाकी जळीत कांडामागील सूत्रधाराचा कामोठे पोलीस घेत आहेत शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हार्बर रेल्वे मार्गावरील मानसरोवर रेल्वे स्थानकालगत आग लागल्यामुळे ४२ दुचाकी वाहने आगीत जळून खाक झाल्याची घटना घडल्यानंतर कामोठे पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे. या दुचाकी जळीत कांडामागील सूत्रधाराचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु केली असली तरी पोलिसांच्या हाती अद्याप काहीच लागलेले नाही. त्यामुळे या दुचाकी जळीत कांडामागचे गुढ अद्याप कायम आहे.

कामोठे आणि आजुबाजुच्या भागात राहणारे अनेक दुचाकी चालक मानसरोवर रेल्वेस्थानक परिसरातील मोकळ्या जागेत मिळेल तिथे दुचाकी उभी करीत होते. मानसरोवर रेल्वे स्थानका लगतच्या ज्या भागातील दुचाकींना आग लागली, त्या जागेवर मोठ्या प्रमाणात गवत वाढले होते. या गवतामध्येच अनेक जण मिळेल त्या जागेवर आपली दुचाकी पार्क करन लोकल पकडून कामावर निघून जात होते. त्यानंतर सायंकाळी कामावरुन मानसरोवर रेल्वे स्थानकात उतरल्यानंतर आपली दुचाकी घेऊन जात होते. कामोठे वसाहत ते मानसरोवर रेल्वेस्थानक असा अडीच ते तीन किलोमीटर अंतराचा पल्ला गाठण्यासाठी दुचाकीचालक दररोज कामावर ये-जा करण्यासाठी या दुचाकीचा वापर करत होते. मात्र, आगीचे निमित्त होऊन मानसरोवर रेल्वे स्थानका लगतच्या भागात उभ्या असलेल्या ४२ दुचाकींनी एकामागोमाग एक पेट घेतला. यातील ३४ पूर्ण तर ८ दुचाकी अर्धवट जाळल्या आहेत. आगीच्या घटनेनंतर त्याठिकाणी दुचाकीचा सांगाडा पडला होता. त्यामुळे नेमकी आपली दुचाकी कोणती ? असा प्रश्न प्रत्येक दुचाकी चालकाला पडला होता. सदर प्रकार पाहून पोलीस देखील हैराण झाले होते. नेमकी सदर आग कोणी लावली की लागली ? याबाबत पोलीस आणि अग्निशमन दलाकडून तपास करण्यात येत होता. सुरुवातीला कामोठे पोलिसांनी अकस्मात जळीत म्हणून या घटनेची नोंद केली होती. मात्र, नंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्ही फुटेजद्वारे तपास सुरु केला आहे.

# उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची निवडणूक निर्णय कार्यालयात झुंबड



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका या १८ डिसेंबर रोजी पार पडत आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ही २ डिसेंबर असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उरण येथील निवडणूक निर्णय कार्यालयात मोठ्या प्रमाणात उमेदवारांनी गर्दी केली होती.

उरण तालुक्यात एकूण ३३ ग्रामपंचायती असून त्यापैकी जसखार, करळ, पाणजे, नवीन शेवा, घारापुरी, डोंगरी, बोकडविरा, भेंडखळ, नवघर, पागोटे, पुनाडे, धुतूम, रानसई, कळंबुसरे, पिरकोण, सारडे, वशेणी अशा १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका १८ डिसेंबर रोजी होत आहेत. या निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना, शेकाप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे यांनी गावा गावात आघाडी, युतीच्या माध्यमातून भक्कम मोर्चे बांधणी करण्यासाठी सुरुवात केली आहे.

उरण तालुक्यात भाजपचे वर्चस्व वाढले आहे. त्यामुळे महत्वाच्या असणाऱ्या १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी गाव पातळीवर भाजपाशी संधान बांधले आहे. त्यामुळे पक्षाची आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी प्रत्येक पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी धडपड सुरू केली आहे. शुक्रवारी ( दि२ डिसेंबर) उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने अनेक इच्छुकांनी आप आपल्या कुटुंबासह उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात गर्दी केल्याचे चित्र पाहावयास मिळत होते.

# स्व.बॅ.ए.आर.अंतुले यांच्या स्मृतीस रायगड काँग्रेसतर्फे अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



कोकणचे भाग्यविधाते, रायगडचे सुपुत्र, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय बॅरिस्टर ए. आर. अंतुले साहेब यांच्या २ डिसेंबर रोजी स्मृतिदिनानिमित्त रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष मा. श्री महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत उलवे येथील कार्यालयात अंतुले साहेबांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी सांगितले की, अंतुले साहेबांनी महाराष्ट्र राज्याला प्रगतीपथावर घेवून जाण्यासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. साहेबांची निर्णयक्षमता, दूरदृष्टीपणा व प्रशासनावरील पकड, महाराष्ट्राला कायम लक्षात राहील. आज जो काही कोकणचा विकास झाला आहे तो फक्त अंतुले साहेबांमुळेच. अंतुले साहेबांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी लोकनेते. दि. बा पाटील साहेब यांचे सुपुत्र. श्री अतुल पाटील, पनवेल पंचायत समितीचे माजी उपसभापती. श्री. वसंत काठावले, पनवेल तालुका काँग्रेसचे अध्यक्ष श्री. नंदराज मुंगाजी, के. डी कोळी, अरुण कोळी, अश्विन नाईक, भरत गायकवाड, रुकेश काठावले व काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# साळाव येथे बिबट्याचा हल्ल्यात म्हशीच्या दोन पारड्यांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील साळाव येथे बिबट्याचा हल्लूयात कृष्णा पाटील यांच्या वाड्यातील म्हशीच्या दोन पारड्यांचा मृत्यू झाला आहे.

साळाव परीसरात गेल्या दहा बारा दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याची चर्चा असून दि.३० नोव्हेंबरच्या रात्री बिबट्याने केलेल्या हल्लूयात गावातील कृष्णा रामा पाटील यांच्या वाड्यातील म्हशीच्या दोन पारड्यांचा मृत्यू झाला आहे.

याबाबतची माहिती समजताच रोहा येथील वनविभागाचे उपवनसंरक्षक व मुरुड वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बोर्ली वनपाल वैभव शिंदे, वनरक्षक पंढरिनाथ दिघे, भगवान पिंगळे यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन सदर घटनेचा रितसर पंचनामा करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.यांनी म्हशीच्या दोन पारड्यांचे शवविच्छेदन करण्यात आले असून पुढील तपास वनविभागाचे अधिकारी करीत आहेत.

तालुक्यातील साळाव परीसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याने नागरिकांनी देखील विशेष करून रात्रौ-अपरात्रौ काळजी घ्यावी. असेआवाहन वनविभागातर्फे करण्यात आले आहे.


मा.मुजावर साहेब

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.सतीश स. फडके

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सा़ो., वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६७४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०१/२०२३

कै.गिरीश कृष्णप्रसाद मोदी (मयत तर्फे वारस)
१) कु.रुपाली गिरीश मोदी (मुलगी)
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : वकील
रा.डी/८, सेंट्रल बँक कॉलिग्स सीएचएस,
दादाभाई क्रॉस रोड नं.३, विले पार्ले वेस्ट,
मुंबई-४०००५६
२) श्री.कार्तिक गिरीश मोदी (मुलगा)
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.ई-२०१, अनमोल टॉवर एस वी रोड,
विरुद्ध पटेल पेट्रोल पंम्प, गोरेगाव वेस्ट,
मुंबई-४००१०४ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.गिरीश कृष्णप्रसाद मोदी यांचे निधन दि.०२/०६/२०१५ रोजी डी/८, सेंट्रल बँक कॉलिग्स सीचएस लि., दादाभाई क्रॉस रोड नं.३, विले पार्ले वेस्ट, मुंबई-४०००५६ येथे मृत्यू पावले आहेत. मयत कै.गिरीश कृष्णप्रसाद मोदी त्यांचे मृत्यू समयी त्यांचे व अर्जदार यांचे नावे मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची सदनिका (फ्लॅट) आहे. मयत कै.गिरीश कृष्णप्रसाद मोदी यांचे मृत्यूसमयी त्यांचे व अर्जदार यांचे नावे असलेली खालील वर्णनाची सदनिका (फ्लॅट) आहे.

**सदनिका (फ्लॅट) चे वर्णन**

**सदनिका कं./फ्लॅट नं.२०५, दुसरा मजला, सेलेबल एरिया ५४.०१० चौ.मी. कारपेट + ९.१०४ चौ.मी. टेरेस, पार्वती आंगण को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.६६, सेक्टर-२१, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड.** सदनिका (फ्लॅट) मिळकत आहे. अर्जदार हे वरील मिळकतीसंदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जदार हे एकमेव वारस असल्यामुळे या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलामार्फत हजर राहून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदारांच्या लाभात पुरावा घेण्याची कारवाई करेल व अर्जदार हे मयत कै.गिरीश कृष्णप्रसाद मोदी यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२९/११/२०२२ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



अर्जदारांकरिता ॲडव्होकेट : ॲड.उदय प्र.मोकल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५३०/२०२२
नि.नं.८
ने.ता.१६/१२/२०२२

(कै.राहामातुल्ला इब्राहीम शेख यांचे कायदेशीर वारस)
१) मोहमद बादशा राहामातुल्ला शेख (मुलगा)
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
२) मोहमदीन मोहमद राहामातुल्ला शेख (मुलगा)
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
३) शिराजुनिशा कादर शरिफ (मुलगी)
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
४) बदरुनिशा मोहम्मद हुसेन (मुलगी)
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
५) झीनतबी राहामातुल्ला शेख (पत्नी)
वय : ६७ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार नं.१ ते ५ रा.रुम नं.२९२, तत्सलाताई
नाईक नगर, इंदिरा पंचशिला मंडळ बालाजी लाईम डेपो,
चेंबुर, मुंबई, पिन कोड-४०००७१ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.राहामातुल्ला इब्राहीम शेख यांचे निधन दि.२७/११/२००८ रोजी चेंबुर मुंबई येथे राहत्या घरी झालेले आहे. कै.राहामातुल्ला इब्राहीम शेख यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै.राहामातुल्ला इब्राहीम शेख कायदेशीर वारस आहेत.

कै.राहामातुल्ला इब्राहीम शेख व त्यांचा मुलगा मोहमद बादशा राहामातुल्ला शेख (अर्जदार क्रं.१) यांनी मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजे : कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल,**
**जि.रायगड, येथील निवासी सदनिका**
**मौजे : कामोठे, नवी मुंबई**
**अहिंसा को.ऑप.हौ.सोसायटी लि.,**
**मानसरोवर कॉम्प्लेक्स फेज : ३,**
**प्लॉट नं.४०४, बिल्डींग नं.ई,**
**चौथा मजला, प्लॉट नं.१ व २, सेक्टर १८,**
**क्षेत्रफळ : ३७१.०० चौरस फुट कारपेट एरिया**
**५३०.०० चौरस फुट बिल्टअप एरिया**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.राहामातुल्ला इब्राहीम शेख यांचे हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३०/११/२०२२

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२३३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०१/०२/२०२३

कु.अनुज जयराम पाटील व इतर अर्जदार
विरुद्ध
श्री.जगदीश मोरेश्वर पाटील व इतर सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.जमनाबाई मोरेश्वर पाटील रा.मौजे : भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड हे अल्पशः आजाराने दि.०८/०३/२०२२ रोजी राहत्या घरी भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच कै.जमनाबाई मोरेश्वर पाटील यांचे पती मोरेश्वर मंगळ्या पाटील दि.३०/०८/२०२२ रोजी मौजे : भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे व कै.जयराम मोरेश्वर पाटील हे दि.२४/०२/२०१८ या दिवशी डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१) अनुज जयराम पाटील रा.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड २) सौ.हिमांगी जितेश म्हात्रे रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड ३) श्रीमती. ज्योत्स्ना जयराम पाटील रा.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड ४) कु. आराध्य जयराम पाटील रा.भेंडखळ, तालुका : उरण, जिल्हा : रायगड

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ७१/८३-८४/भेंडखळ | २५ | ६ | ०-०४-५ |
| | १२२ | १६ | ०-११-० |
| | १२६ | ५ | ०-७-० |
| | १३९ | १ | ०-७-०६ |
| | १४० | ३ | ०-१७-६ |
| १२/८३/भेंडखळ | ६० | ३ | ०-२४-० |
| | ९५ | ६ | ०-०५-८ |
| | ९० | ४ | ०-०५-८ |
| | ९३ | १५ | ०-०६-०६ |
| | ९९ | ८ | ०-०८-० |
| | ३१९ | १ | ०-०९-० |
| ५७/८१/भेंडखळ | ४३ | १ | ०-२८-७ |
| | १०४ | ३ | ०-६-९ |
| | ११९ | १ | ०-२१-५ |
| | ४४ | १ | ०-१३-६ |
| ७३ भेंडखळ | १५४ | १ | ०-१३-५ |
| ७४/८३-८४ भेंडखळ | १३१ | ४ | ०-१०-४ |
| | १२३ | ६ | ०-१७-० |
| ५२/११५ भेंडखळ | १५१ | १० | ०-०२-० |
| | १९७ | १ | ०-०५-० |
| | १९७ | ८ | ०-०७-८ |
| ५४/८१ भेंडखळ | ११६ | १२ | ०-१६-० |
| २४५/८१ भेंडखळ | १९९ | १ ब | ०-३०-०६ |

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

उरण
दि.०१/१२/२०२२

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण



## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

### जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी-१ नमुन्यात मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत+ १८% विक्री कर= एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भटक्या मांजरीचे लसीकरण व निर्बिजीकरण करणे करिता पालिका मालकीच्या श्वान निर्बिजीकरण केंद्र पोदी येथे स्टील केज व पत्रा शेड बनविणे. | ८,४६,१२९/- (Without GST) | ८५००/- | ५००+९०=५९० | ३० दिवस |

याकामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि.०२/१२/२०२२ पासून दि.०८/१२/२०२२ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र.१ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सिलबंद निविदा दि.०९/१२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्वीकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.०९/१२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा ना मंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/बांधकाम/४४२२/प्र.क्र.०६/३०४०/२०२२
दि.२/१२/२०२२

# संक्षिप्त...

## ५ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे डिसेंबर २०२२ मध्ये होणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि.५ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी १.०० वा.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला आहे, असे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी कळविले आहे.

## सुंदरराव मोरे महाविद्यालयात एड्स जनजागृती प्रचारफेरी व विशेष व्याख्यान कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जागतिक एड्स दिन व सप्ताहानिमित्त येथील शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ग्रामीण रुग्णालय पोलादपूरच्या एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र (आयसीटीसी सेंटर) यांच्या सहकार्याने रेड रिबन क्लब अंतर्गत ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक सौ.भाग्यरेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली (दि.०१ डिसेंबर २०२२) रोजी विशेष व्याख्यान व जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राम बरकुले व प्रा. डॉ. जयश्री जाधव-पाटील यांनी ग्रामीण रुग्णालयाच्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ व आयसीटीसी विभागाच्या सौ.सीता जाधव, सक्षम मायग्रंट टी आय या सामाजिक संस्थेचे श्री. कुणाल खुटवळ, श्री.रोशन पहेलकर आदी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना सक्षम सामाजिक संस्थेचे कुणाल खुटवळ यांनी तरुण पिढीने एड्स या मानवजातीला आव्हान ठरू पाहणाऱ्या आजाराबद्दल योग्य ती शास्त्रीय माहिती प्राप्त करून त्याच्या आधारे समाजातील सर्व घटकांपर्यंत जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# ग्रामपंचायत गुळसुंदे व एमआयडीसी यांच्या कराराप्रमाणे अधिकृत नळ जोडणी

### २०१८ पासून सुरु असलेल्या पाठपुराव्याला मोठे यश; आ.महेश बालदी तसेच गुळसुंदे ग्रामपंचायतीचा पाठपुरावा कामी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रामपंचायत गुळसुंदे व एमआयडीसी यांच्या बरोबर झालेल्या कराराप्रमाणे अधिकृत नळ जोडणी करण्यात आली असून त्याचे उद्घाटन तीन गावातील शेकडो ग्रामस्थांच्या साक्षीने झाले. त्यामुळे आता गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील लाडीवली, आकुलवाडी, गुळसुंदे तसेच आदिवासी वाड्यांना शुद्ध व मुबलक पाणी मिळणार असून २०१८ पासून सुरु असलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. याकामी आमदार महेश बालदी तसेच गुळसुंदे ग्रामपंचायतीचा पाठपुरावा कामी आला आहे.



लाडीवली येथे झालेल्या या कार्यक्रमासाठी सरपंच हरिचंद्र बांडे, उपसरपंच शांताराम मालुसरे, राजिपग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता सुनिल मिटकरी, एम्आयडीसीचे अधिकारी पाचपुंड, सदस्य मनोज पवार, मारुती माठल, सदस्या नुतन पाटील, प्रभावती कार्लेकर, नीता महाडिक, पल्लवी ठाकूर, जयश्री ठोकल, अनिता वाघमारे,तुराडे ग्रामपंचायतीचे सरपंच चंद्रकांत भोईर, उपासना गोठळ, चावणे सरपंच सोनावळे, माजी सरपंच आर. डी. पाटील, प्रमोद विद्ववांस, गणपत गोठल, कॉन्ट्रॅक्टर विशाल मांडे, प्रभाकर कार्लेकर, संतोष चौलकर, अंकुश साठे, महादेव कावडे, चंद्रकांत ठोकळ, बाळकृष्ण पाटील, बाळा शेडगे, अनंता म्हामणकर, अशोक मालुसरे किरण कार्लेकर, भगवान गोडीवले, महादेव शिर्के, भास्कर म्हामणकर, हर्षद कालेकर, नितीन काईनकर, पांडुरंग जाधव, जयवंत म्हामणकर, साहिल म्हामणकर, अलका म्हामणकर, प्रथमेश पाटील, प्रकाश जोशी, दिलीप देव, सुरेश जोशी, निखील पाटील, प्रकाश मोरे, शेखर नवरंगे, विनायक पाटील, प्रशांत पाटील, उमेश गायकवाड, कौस्तुभ चोणकर, भानुदास म्हात्रे, राजा दळवी, संजय पाटकर, अंकीता गोठळ, मेघना जाधव संजय मालुसरे, विलास पाटील, रमेश मालुसरे, नारायण शेडगे, दामोदर चव्हाण, काशिनाथ तांबे, अनिल पंडीत, संतोष मोरे, आंबू पवार, रामकृष्ण म्हात्रे, भरत पाटील, महेश मोरे, प्रवीण मोरे, रमेश लेखाकर, सचिन मालुसरे यांच्यासह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदेचे सरपंच व सदस्य यांनी २०१८ पासून सर्व प्रथम पाणी टंचाईची कमतरता का होत आहे याची माहिती घेऊन त्या संदर्भात योग्य उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांचे मार्गदर्शन व सहकार्य घेतले. एम. आय. डी. सी. कडून जोडणी मिळाल्यास भरपूर प्रमाणात पाणी मिळेल अशी खातरजमा करत आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतने एमआयडीसीच्या अंबरनाथ व अंधेरी येथील कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा केला. पुर्वीचा चालू असलेला जिल्हा परिषद पाणी पुरवठा कमी दाबाने व अशुद्ध मिळत होता. सदरचा पाणी पुरवठा गावांना कमी प्रमाणात व कमी दाबाने पाणी मिळत असल्याने चार पाच दिवसानून एका पाणी मिळत होते. या कारणासाठी आमदार महेश बालदी यांच्याकडे ही समस्या मांडली असता त्यांनी त्यांच्या आमदार निधीतील पहिले २० लाखाचा निधी पाईप लाईनसाठी लाडीवली व आकुळवाडी गावांना दिला. त्यामुळे सदर पाईप लाईनमधून त्या गावांना एक दिवसआड पाणी सुरू झाला. सदर एम्आयडीसी चे कनेक्शन मिळविण्यासाठी ग्रामपंचायत तुराडे सरपंच व वावेघर ग्रामपंचायत सरपंच त्यांच्याकडे पाणी बील थकबाकी पैकी मार्च २०२२ पासून ५०% भरले व पुढील थकबाकी भरण्याचे लेखी आश्वासन एमआयडीसीला दिले, अशी माहिती गुळसुंदे ग्रामपंचायतीचे सदस्य मनोज पवार यांनी यावेळी दिली.

# परवानाधारक रिक्षाचालकांना जाहीर केलेल्या पॅकेजसंदर्भातील योजनेची ऑनलाईन प्रणाली बंद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यात मार्च २०२१ पासून कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेदरम्यान ब्रेक द चेन अंतर्गत निर्बंध लागू करण्यात आले होते. त्यामुळे दुर्बल घटकांना तातडीची आर्थिक मदत देण्यासाठी शासनाने परवानाधारक रिक्षा चालकांना प्रत्येकी रु.१ हजार ५०० एकवेळेचे अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

ऑनलाईन पध्दतीने शेवटचा अर्ज दि.३१ डिसेंबर २०२१ रोजी प्राप्त झाला होता. तसेच ऑफलाईन पध्दतीने दि.२५ मार्च २०२२ रोजी प्राप्त झाला.

त्यानंतर गेल्या ४ ते ६ महिन्यापासून या योजनेत एकही अर्ज प्राप्त न झाल्याने शासन मान्यतेने परवानाधारक रिक्षाचालकांना जाहीर केलेल्या पॅकेजसंदर्भात योजनेची ऑनलाईन प्रणाली शासनाद्वारे बंद करण्यात आली असून याबाबत सर्व रिक्षा चालक-मालक संघटनांनी नोंद घ्यावी, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण श्री.महेश देवकाते यांनी कळविले आहे.

# रिव्हर राफ्टिंगचा थरार आता अनुभवा कर्जतमध्ये

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रिसॉर्ट मालक भूमिपुत्र संघटना यांच्या सहाय्याने कर्जत येथील पेज नदीवर कर्जत रिव्हर राफ्टिंग चा थरार काल दि.१ डिसेंबर पासून सुरू झाला आहे. संघटनेचे अध्यक्ष उदय पाटील यांनी श्रीफळ वाढवला आणि सर्व सदस्यांनी प्रथम रिव्हर राफ्टिंग केले. निसर्ग सौंदर्याचे वरदान लाभलेल्या कर्जतची भुरळ नेहमीच पर्यटकांना पडते. एक दोन दिवस प्रदूषणमुक्त निसर्गाच्या सानिध्यात घालवून ताजे तावाने होण्यासाठी अनेक पर्यटक कर्जतला येत असतात. स्थानिक तरुणांनी पर्यटन व्यवसायात प्रगती केली आहे. तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांना उत्तम प्रतीचे जेवण मिळावे, सुट्टीचा मनमुराद आनंद घेता यावा यासाठी सर्वच सुविधा आपल्या रिसॉर्ट वर उपलब्ध करून देण्याचा येथील तरुणाई सातत्याने प्रयत्न करीत आहे. येथे



आलेल्या पर्यटकांची उत्तम सोय करून त्यांना फ्रेश करण्याचा प्रयत्न भूमिपुत्र करीत आहेत. तालुक्यात अनेक पर्यटक यावेत आणि त्या माध्यमांतून किरकोळ व्यवसाय करणाऱ्या तरुणाच्या हाताला काम मिळावे याचा प्रयत्न सातत्याने करीत आहेत. कर्जत रिव्हर राफ्टिंगच्या माध्यमांतून पेज नदीवर चालू झालेला ५ किलोमिटर अंतराचा नागमोडी वळणाने पाण्याचे तुषार अंगावर घेत चित्तवेधक थरार यापुढे अनेक पर्यटकांना आकर्षित करील आणि त्या माध्यमांतून भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

# अंतुले साहेबांचे अपुरे कार्य पुढे नेण्यासाठी सदैव तत्पर राहू : अभिजीत पाटील

### बॅ.ए.आर.अंतुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आंबेत येथील स्मृतीस्थळी विनम्र अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्याचे माजी मुख्यमंत्री, कोकणचे भाग्यविधाते बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांच्या आज (शुक्रवार दि.२ डिसेंबर) स्मृतिदिनानिमित्त पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभिजीत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, रोजगार व स्वयंरोजगार विभाग पनवेल शहर जिल्हाध्यक्ष भाई म्हात्रे व प्रताप गावंड यांनी आंबेत येथे बॅ ए आर अंतुले यांच्या स्मृतीस्थळी दर्शन घेऊन आदरांजली वाहिली. तसेच बॅ ए आर अंतुले यांच्या आंबेत येथील निवासस्थानी तसेच श्रीवर्धन, म्हसळा तालुक्याला भेट देऊन माजी आमदार मुश्ताकभाई अंतुले व जेष्ठ नेते आर सी घरत यांच्यासह पुढील राजकीय वाटचालीबाबत व बॅ ए आर अंतुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांबद्दल सविस्तर चर्चाही केली. आंबेत येथील बॅरिस्टर ए आर अंतुले यांच्या स्मृतीस्थळी अंतुले यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्याप्रती कृतज्ञताही व्यक्त करण्यात आली.



यावेळी काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष अभिजीत पाटील म्हणाले, अंतुले साहेब म्हणजे सामान्यातील असामान्य नेतृत्व होते. त्यांनी कधीही राजकारण न करता नेहमीच समाजकारणाला प्राधान्य दिले. खऱ्या अर्थाने ते गोरगरिबांचे, कष्टकऱ्यांचे, कामगारांचे व समाजातील तळागातील नागरिकांचे नेते होते. त्यामुळे त्यांच्यासारखे साधी राहणी आणि उच्च विचार असणारे नेते परत कधीही होणार नाही. अंतुले साहेबांच्या स्मृती स्थळावर आल्यावर कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली असल्याचे लक्षात येते. साहेबांचे कार्य अलौकिक आहे. त्यांनी प्रत्येक कार्यकर्त्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले. आम्हाला त्यांचा सहवास व वेळोवेळी मार्गदर्शन लाभले याचा अभिमान वाटतो. त्यामुळे त्यांनी दिलेल्या शिकवणीनुसार अंतुले साहेबांचे समाजकार्य पुढे नेण्याचे नेहमीच काम करत राहू. साहेब परिसासारखे होते, ज्यांना ज्यांना त्यांचा स्पर्श झाला त्याचे सोने झाले. येणाऱ्या काळात त्यांचे राहिलेले कार्य पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू. आज त्यांचा मायेचा हात जरी हरवला असेल तरीही त्यांचे प्रेम आणि आशिर्वाद सदैव आमच्या पाठीशी असणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील म्हणाले की, अंतुले साहेबांचे सोडून जाणे म्हणजे रायगड वासियांसाठी आजचा काळा दिवस असेल. अंतुले साहेब आमच्यात नाहीत असे वाटतच नाही. अंतुले साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्राला प्रेम दिले. रायगडमध्ये असणारे वैभव हे अंतुले साहेबांमुळे आहे. त्यांच्या काळात अनेक धाडसी निर्णय त्यांनी घेतले. साहेबांच्या शेवटच्या काळात त्यांचा सहवास लाभला. ते राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, खासदार आणि आम्ही सर्वसामान्य कार्यकर्ते असा दुजाभाव त्यांनी कधीही दाखवला नाही. साहेब अत्यंत प्रेमळ होते. त्यांचा ८५ वा वाढदिवस करण्याचे जेंव्हा आम्ही ठरवले तेव्हा त्यांची प्रकृती ठीक नव्हती. तरीही कार्यकर्त्यांची इच्छा होती की त्यांनी एकदा जिल्ह्यात यावे आणि इथल्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन द्यावे. प्रकृती अत्यवस्थ असताना देखील त्यांनी येण्यास होकार दिला. त्यावेळीचे त्यांचे शब्द अजूनही आठवतात की तुमच्यामध्ये मला माझे जुने दिवस दिसतात. तुमच्या सारख्यांची आता जिल्ह्याला, राज्याला, देशाला गरज आहे. अंतुले साहेबांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतल्यावर नेहमीच नवी ऊर्जा मिळते.

# प्रशासक सुरेखा भणगे यांच्याकडून ई रिक्षाच्या चार्जिंग स्टेशनची पाहणी




**दै.रायगड नगरी । माथेरान**

सर्वांनाच प्रतीक्षा असणाऱ्या ई रिक्षाची सेवा लवकरच उपलब्ध होणार असल्याने या बॅटरी वर चालणाऱ्या ई रिक्षाच्या चार्जिंग स्टेशनची पाहणी आज दि.२ रोजी नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे ( शिंदे ) यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी वर्गासह केली.यावेळी त्यांच्यासोबत नगरपरिषद अभियंता स्वागत बिरंबोले, आरोग्य विभागाचे सदानंद इंगळे, लेखापाल अंकुश इचके, कार्यालय अधीक्षक प्रवीण सुर्वे, रोखपाल राजेश रांजाणे,आरोग्य निरीक्षक अभिमन्यु येळवंडे आदी उपस्थित होते.

काही महिन्यांपासून स्थानिक नागरिक ई रिक्षा केव्हा सुरू होणार याच प्रतीक्षेत होते. परंतु काही तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी वेळ लागल्याने थोडा उशीर झाला होता. एकूण चार ठिकाणी ही चार्जिंग स्टेशन उभारण्यात आली आहेत. मुख्य प्रवेशद्वार असणारा दस्तुरी नाका, रेल्वे स्टेशन जवळील कम्युनिटी सेंटर, सार्वजनिक वाचनालय आणि नगरपरिषदेच्या आवारात ही चार्जिंग स्टेशन उभारण्यात आली आहेत. ई-रिक्षासाठी लागणारे चार्जिंग स्टेशनचे काम सुध्दा जवळजवळ पुर्ण झालेले असून काही उणीवा राहू नयेत यासाठी सुरेखा भणगे संबंधित अधिकारी वर्गाला सूचना देऊन कामे पूर्ण करून घेत आहेत. काही दिवसांत शालेय विद्यार्थ्यांना त्याचप्रमाणे आबालवृद्ध पर्यटक, नागरिक आणि रुग्णांना या सेवेचा लाभ घेता येणार आहे.

**ई-रिक्षा ची सेवा सोमवार ते गुरुवार सकाळी ६.३० ते रात्री ७ आणि शुक्रवार ते रविवारी सकाळी ६.३० ते रात्री १० पर्यंत ही सेवा उपलब्ध होणार आहे. यामध्ये शालेय विद्यार्थी, आबाल वृद्ध, पर्यटक, नागरिक, रुग्ण यांना याचा लाभ घेता येणार आहे.**

**सुरेखा भणगे (शिंदे) -प्रशासक तथा मुख्याधिकारी नगरपरिषद माथेरान**

ई रिक्षा साठी पर्यावरण पूरक असे क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांचे काम सनियंत्रण समितीच्या परवानगीनुसार लवकरच पूर्ण होण्यासाठी युद्धपातळीवर कामे सुरु आहेत.सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार प्रशासक सुरेखा भणगे यासुद्धा आपल्या कामात काहीच कमी पडू देत नाहीत. त्यांनी शासनाच्या आदेशाप्रमाणे या अत्यावश्यक सुविधेसाठीच्या कामात स्वतःला झोकून दिले आहे.

ई -रिक्षाच्या सेवेमुळे रात्री अपरात्री येणाऱ्या पर्यटकांना त्याचप्रमाणे स्थानिक लोक सुध्दा रात्री उशिरापर्यंत दस्तुरी नाक्यावर येत असतात. त्यामुळे दस्तुरी पासून गावात येण्यासाठी आपल्या सामानासह,लहान लहान मुलांना घेऊन येणे खूपच त्रासदायक बनले होते. ई रिक्षाचा स्वस्त आणि सुरक्षित प्रवास उपलब्ध होणार असल्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**माथेरान मध्ये ई रिक्षा सुरू होणार आहे ही गोष्ट खूपच आनंदाची असून यापुढे इथे जास्त प्रमाणात जेष्ठ, वयोवृद्ध, अपंग पर्यटक सुध्दा येतील. आमचे वयोवृद्ध नातेवाईक अनेकदा बोलून दाखवतात की, आमची माथेरान बघण्याची खूप इच्छा आहे पण इथे वाहतुकीची स्वस्त दरात सोय उपलब्ध नव्हती ती आता ई रिक्षाच्या माध्यमातून भरून निघणार आहे. ई-रिक्षाचे आम्ही स्वागत करतो.**

**नैना भारद्वाज -**
**- पर्यटक, नालासोपारा (मुंबई )**

# कोकण विभागीय भूजल साक्षरता व जनजागृती कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत भूजलाची उलब्धता, शाश्वतता व सुरक्षितता याबाबत जनजागृती करणे, तसेच भूजल साक्षरतेचे महत्व जनसामान्यांपर्यंत अधोरेखित करण्याकरीता प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोकण विभाग यांच्यावतीने दि.२९ नोव्हेंबर,२०२२ रोजी एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा शासकीय अधिकारी, कर्मचारी, सरपंच, जलसरक्षक, महिला बचतगट तसेच ग्रामस्थांसाठी आयोजित करण्यात आली होती.




भूजल विकास व पाणी व्यवस्थापनेचे महत्व लोकसहभागातून शक्य आहे. त्याबाबत व्यापक जनजागृतीची आवश्यकता या कार्यशाळेतून मांडण्यात आली. यावेळी माहिती पत्रिका, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन आदि माध्यमांतून माहिती देण्यात आली. कार्यशाळेच्या सुरुवातीला भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोकण विभागाचे उपसंचालक बी.आर.टोणपे यांनी पाण्याच्या नियोजनाचे व व्यवस्थापनाचे महत्व सांगितले. ठाणे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.गोळे यांनी जलजीवन मिशनचा उद्देश विषद केला. विविध विभागातून आलेले भूजल तज्ञ, भूवैज्ञानिक, जलनितीतज्ञ यांनी उपस्थितांना भूजल विकास व व्यवस्थापनाची माहिती, जलनिती विषयक माहिती, पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबतचे महत्व या विषयांसंबंधित माहिती दिली. तसेच मार्गदर्शनही केले.

दुसऱ्या सत्रात कोकण विभागातील भूजल, भूशास्त्रीय रचना, स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना, ग्रामस्तरीय पाण्याचा ताळेबंद, पावसाचे कृत्रिम पुनर्भरण, कार्यशाळेच्या सौरऊर्जेवरील नळ पाणीपुरवठा योजना या विषयांवर सखोल, सविस्तर माहिती व मार्गदर्शन करण्यात आले. जीवन प्राधिकरण संचालनालय,पुणेच्या उपसंचालक श्रीम.मग्गीरवार यांनी पाण्याचे नियोजन व व्यवस्थापनाचे महत्व सांगितले.

या कार्यशाळेस येरळा नदी समन्वयक सातारा, प्रकाश जाधव, यशदा पुणेचे कोकण समन्वयक, गणेश खातू, म्युन्सिपल दादरचे नॅलिस्ट, संतोष जठार, भूवैज्ञानिक, मृणाली लोखंडे, भूवैज्ञानिक, सागर देसाई, उपअभियंता, श्री.थोरात, सेवानिवृत्त वरिष्ठ खोदन अभियंता, श्री.वानखेडे तसेच कोकण विभागातील शासकीय अधिकारी, कर्मचारी, सरपंच, जलसुरक्षक, महिला बचतगट आदि मान्यवर उपस्थित होते. विविध स्तरावर जलजागृती व जलसाक्षरता होणे हा या कार्यशाळेमागचा प्रमुख उद्देश होता.